बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०२ । अंक – ३५५ । वार मंगळवार दि १६ सप्टेंबर एचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 02 Issue - 355 tuesdy 16 September 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4


# स्व.गोपीनाथ मुंडे, केशर काकू अमोल गलधराचं स्वप्न पूर्ण, बीडच्या अंगणात धावणार झूक-झूक रेल्वे गाडी




सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४







## बीडकरांच्या आयुष्यात अखेर रेल्वेचा ऐतिहासिक आगमन; सत्ता बदलली, चेहरे बदलले पण बीडकरांचा साठ वर्षांचा संघर्ष बदलला नाही!

## नकाशावरुन वगळलेलं बीड अखेर भारताशी रेल्वेने जोडले जाणार

















**बीड (प्रतिनिधी):– बीडकरांनी दोन पिढ्या आश्वासनं, राजकारण, आंदोलनं आणि संघर्ष यांना वाहिल्या. प्रत्येक निवडणुकीत रेल्वेचा मुद्दा ऐरणीवर असायचा; पण प्रत्यक्षात बीडच्या नकाशावर रेल्वेचं नावही नव्हतं. अखेर १७ सप्टेंबर २०२५ रोजी हा ऐतिहासिक दिवस उजाडतो आहे. मराठवाडा मुक्ती दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अहमदनगर–बीड–परळी रेल्वेमार्गाचं ऑनलाइन उद्घाटन होणार असून, बीड जिल्ह्याच्या अंगणात रेल्वे धावणार आहे. या ऐतिहासिक क्षणाला उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री धनंजय मुंडे, खासदार बजरंग सोनवणे आदी मान्यवर उपस्थित राहून रेल्वेला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. बीडकरांच्या संघर्षामुळे उभारलेली ही 'प्रगतीची गाडी' धावण्यास सज्ज झाली आहे. स्व.गोपीनाथ मुंडे, अमोल गलधर आणि केशर काकू क्षीरसागर यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी बीडमध्ये रेल्वे आणण्यासाठी जिवाची बाजी लावली. आज त्यांचे स्वप्न प्रत्यक्षात येत असल्याने बीडकरांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आहेत. रेल्वे आल्यामुळे बीडच्या सामाजिक, औद्योगिक, व्यापारी आणि पर्यटन विकासाला नवी दिशा मिळणार आहे. मुंबई, पुणे, नगर भागात नोकरी–व्यवसायासाठी गेलेल्या लेकीबाळींना माहेरी येणं आता सोपं होणार आहे. शेतकऱ्यांच्या मालाला नव्या बाजारपेठा मिळणार आहेत. बीड जिल्ह्याच्या विकासाची गाडी आता खऱ्या अर्थाने रुळांवर धावू लागणार आहे.**

१९६५ या वर्षापासून बीडमध्ये रेल्वे येण्याची चर्चा सुरू होती. त्याला आता सुमारे साठ वर्षे उलटून गेली आहेत. प्रत्येक निवडणुकीमध्ये बीडमध्ये रेल्वे येणार का, हा एक कळीचा मुद्दा असायचा. ती रेल्वे बीडमध्ये येण्याचा मार्ग आता मोकळा झाला असून मराठवाडा मुक्ती दिन म्हणजेच १७ सप्टेंबर रोजी बीडमध्ये रेल्वेचे अधिकृत आगमन होणार आहे. बीडमध्ये रेल्वे येण्यापूर्वी कोकण रेल्वेसारखे प्रचंड अवघड असे प्रकल्प पूर्ण करण्यात आले. जम्मू–काश्मीरसारख्या पहाडी भागातसुद्धा रेल्वे पोहोचली; परंतु बीड रेल्वेच्या नकाशावर अजिबात नव्हते. ती रेल्वे आता बीडमध्ये येण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

बीड जिल्ह्यामध्ये रेल्वे मार्गाचे जाळे अजिबातच नव्हते असे नाही. परळी येथून हैदराबाद आणि मुंबई या ठिकाणी जाण्यासाठी रेल्वे उपलब्ध होत्या. एकंदरीत बीडकरांना मात्र रेल्वे प्रवासाची उत्कंठा आहे. कारण, त्यांना त्याची बालपणापासूनच सवय नाही. एखाद्या बीडच्या मुलाने रेल्वे पाहण्याचा हट्ट वडिलांकडे केला, तर त्याला बसचे तिकीट काढून परळीला जावे लागत असे. आता बीड–अहमदनगर रेल्वेने जोडले गेल्यामुळे बीडकरांना संपूर्ण भारताबरोबर जोडले जाण्याचा आनंद मिळणार आहे.संपूर्ण भारतभरात रेल्वेचे जाळे विणले जात असताना बीडकर मात्र अत्यंत दुःखी अंत:करणाने देशाची प्रगती पाहत होते. ज्या भागात रेल्वे पोहोचते, त्या भागाची झपाट्याने प्रगती होते, यात आता कोणालाही शंका राहिलेली नाही. रेल्वे जाणार्या भागातून नाशवंत उत्पादने जसे की फुले, भाज्या, धान्य तातडीने देशाच्या इतर भागांमध्ये पोहोचवता येतात. महाराष्ट्रासाठी जवळपास सव्वा कोटी लोकसंख्येची मुंबई हे एक फार मोठे मार्केट आहे. मुंबईतील लोकांची अन्नधान्याची, दुधाची, भाज्यांची गरज पूर्ण महाराष्ट्र पुरवत असतो. रेल्वेच्या आगमनाबरोबरच बीडकरांसाठी प्रगतीची कवाडे खुली झाली आहेत, असे म्हणायला हरकत नाही. पर्यटन, तीर्थाटन, व्यापार, व्यवसाय, मालाची ने–आण या सर्वांसाठी रेल्वेचा नवीन पर्याय बीडकरांसाठी उपलब्ध झाला आहे, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.बीड हे माहेर असणार्या आणि पुणे, मुंबई, नगर या भागात नांदणार्या लेकी–बाळींसाठी आता माहेरी जाणे सोपे आणि आरामदायक होणार आहे. बीडमध्ये आजोळ असणार्या बालकांना आता 'झूक झूक गाडी'ने मामाच्या गावाला जाण्याची



सोय झालेली आहे. येणार्या काळात रेल्वेच्या जाळ्याच्या माध्यमातून बीडची झपाट्याने प्रगती झालेली पाहायला मिळण्याची अपेक्षा आहे. हो–नाही करता करता तब्बल साठ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर रेल्वे बीडमध्ये येत आहे, यासाठी समस्त बीडकर आता आनंदात आहेत.म

## संपादकीय...

# ‘डिएला’ म्हणते, मी पैसे खात नाही, कोणाला खाऊ देणार नाही!

ना खाउंगा, ना खाने दुंगा... अशी प्रतीमा असलेले लोक सापडणे सध्या मुश्कील आहे. ज्याला भूकच नाही, अशी व्यक्ती जर निर्णय प्रक्रियेच्या केंद्रस्थानी असेल तर संपूर्ण यंत्रणा पारदर्शक होण्याची निदान शक्यता तरी वाढेल.. पण अशी व्यक्ती मिळणे सद्य:स्थितीत फार अवघड. जिथे मोठ्या प्रमाणावर निधीच्या वापराची गरज आहे अशा कामांसाठी यंत्राचा वापर केला तर, प्रक्रिया पारदर्शक होईल का? असाच काही विचार अल्बानिया या देशाने केला. जिथे सर्वाधिक भ्रष्टाचार होतो, अशा सरकारी कामांच्या निविदा हाताळण्याची जबाबदारी असलेल्या खात्याला अल्बानियाने ‘एआय’ मंत्री दिला. तिचे नाव ‘डिएला’. ही ‘डिएला’ आता अल्बानिया सरकारमध्ये खरेदी विभाग सांभाळणार आहे.

अल्बानिया हा देश तसा छोटा. जवळपास केरळच्या आकाराचा. लोकसंख्या साधारण २५ लाख. म्हणजे भारतातील कोणत्याही मेट्रो सिटीपेक्षाही कमीच. देश छोटा असला तरी दूरदृष्टी मात्र चांगली. या अल्बानियाचे भ्रष्टाचाराचे रँकिंग ८० आहे. ९८ वरून ते ८० वर आले असले तरी हे रँकिंग काही बरे नव्हे. एवढ्या छोट्या देशातही भ्रष्टाचाराचा चारा खाणारे लोक आहेतच. सरकार अन् प्रशासन आले की तिथे थोडाफार भ्रष्टाचार आलाच. भ्रष्टाचार ही प्रवृत्ती आहे. ही प्रवृत्ती देश बदलला तरी कायम राहते.

‘डिएला’ ही सुरुवातीला ई-अल्बानिया या सरकारी पोर्टलवरील साधी डिजिटल मदतनीस होती. नागरिकांना अर्ज भरायला, कागदपत्रे तपासायला मदत करणे एवढेच तिचे काम होते. आता तिला प्रमोशन मिळून ती थेट खरेदी विभागाची मंत्री झाली. कोट्यवधींच्या टेंडर प्रक्रियेवर अंतिम शिक्का मारण्याची जबाबदारी आता तिच्याकडे आहे. पंतप्रधान एदी रामा यांनी ‘डिएला’च्या नेमणुकीचे वर्णन ‘भ्रष्टाचाराविरुद्धचा ऐतिहासिक निर्णय’ असे केले आहे.


ही ‘डिएला’ केवळ ठरवून दिलेल्या निकषांवर निर्णय घेते. ओळखी, शिफारशी, दबाव अशा गोष्टींना येथे थारा नसेल. कारण ‘डिएला’ मानवी भाव-भावना जाणत नाही. सरकारचा पैसा कसा वाचेल आणि चांगले काम कसे होईल, हेही ती बघणार नाही. मानवी भावनांना वा राजकीय फायदा-तोट्याच्या गणितांना तिच्याकडे वाव नसेल. प्रत्येक टेंडरचा निर्णय नियमबद्ध आणि तर्कसंगत पद्धतीने घेणे हेच तिचे काम. ती तेवढेच करेल. शिवाय हजारो अर्जांचे परीक्षण काही मिनिटांत करेल. म्हणजे, खरेदी प्रक्रियेतला वेळ वाचेल. खर्चही कमी होईल. सर्व निर्णय डिजिटल नोंदीत होतील. नागरिकांना तपासणीचा अधिकार राहील आणि सरकार विश्वासार्हतेकडे वाटचाल करेल... असे साधे गणित मांडले जाते आहे.

परंतु, हे सारे करत असतानाच काही धोकेही लक्षात घेतले पाहिजेत. एखादा मंत्री किवा प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी भ्रष्टाचाराचा पैसा खाऊन फुगला असेल तर त्याला जबाबदार धरले जाते. ‘डिएला’ने चुकीचा करार मंजूर केला तर दोष कोणाचा? तिच्यावर कसा खटला चालवणार? ‘डिएला’ने निर्णय कसा घेतला गेला, हे जर लोकांना उमगले नाही तर पारदर्शकतेऐवजी संशय निर्माण होण्याला जागा आहे. ‘डिएला’च्या प्रोग्रामिंगमध्ये जे फिड केलेले असेल, तसे निर्णय ती घेईल. आधीच्या आकड्यांची जुळवाजुळव करेल, पण त्यातच काही खोट केली गेली, तर निर्णयही चुकीचे घेतले जातील. शिवाय हॅकिंगचा धोका आहे, तो वेगळाच. ‘डिएला’ हॅक झाली तर कोट्यवधींच्या करारांचे काय होईल? हॅकर्सना हवे तसे ती वागेल. हॅकर्ससाठी निर्णय घेईल. पारदर्शकतेच्या नावाखाली भ्रष्टाचाराचा नवा दरवाजा उघडेल. माणसाच्या चुका थांबवायला मशीनला मंत्री बनवले. पण, मशीनच्या चुका थांबवायला कोण मंत्री होणार?- असे अनेक प्रश्न या नेमणुकीतून उभे राहिले आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्सची मानवी आयुष्यातील घुसखोरी किती वेगवेगळे टप्पे गाठू शकते, याचे एक उदाहरण म्हणून सध्या ‘डिएला’ चर्चेत आहे. बरे सारे काही सुरळीत झाले, ‘डिएला’ ही सरकारमध्ये यशस्वी मंत्री ठरली तर? प्रशासन आणि सरकार या व्यवस्थेवरच एआयचा अंमल सुरू झाला तर? - या शक्यताही काही कमी काळजी करावी अशा नाहीत.

आणि भारताचे काय? भ्रष्टाचारी देशांच्या रँकिंगमध्ये सध्या भारताचा क्रमांक ९८ आहे. आधी तो ९३ होता. म्हणजे आधीपेक्षाही स्थिती वाईट आहे. म्हणजे मग भारताला ‘डिएला’सारखे किती एआय मंत्री नेमावे लागतील?.... विचार करा!

# मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामात बाबासाहेबांचे अमूल्य योगदान.

## बाबासाहेब पोलीस कारवाईचे प्रवर्तक




सुमारे दीडशे वर्ष भारत भूमीवर राज्य करून १५ ऑगस्ट १९४७ साली ब्रिटिशांच्या सार्वभौमिक राज्य सत्तेचे विलय होताच भारतातील काही छोटे-मोठे संस्थाने, राजे-रजवाडे आपापला सवतासुभा थाटण्याचे राष्ट्रघातकी कृत्य करत होते. यात प्रामुख्याने हैदराबाद, जुनागड, काश्मीर व तत्सम संस्थाने आघाडीवर होते. भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या समितीने या छोट्या-मोठ्या संस्थानांचे विलीनीकरण भारतात करून घेतले. परंतु काही संस्थाने आपले वर्चस्व दाखवीत स्वतंत्र राष्ट्र म्हणून उभारी घेण्याचे मनोराज्यात व्यग्र होते.! गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मागे बाबासाहेबांचे बुद्धी सामर्थ्य असल्यामुळे, या दोन महापुरुषांनी आखलेल्या धोरणाखाली व चोख नियोजनामुळे दिवास्वप्न पाहणारे ही संस्थाने भारतात कायमचे विलीन झाले. याचे श्रेय सरदार पटेल यांना लोहपुरुष म्हणून दिले जाते. परंतु या सर्व गोष्टींच्या मागे बाबासाहेबांचे समतामूलक समग्र चिंतनातून मिळालेले दिव्य सामर्थ्य होते. ही गोष्ट आज बोटावर मोजण्या इतक्या लोकांना ज्ञात आहे. एक शतकाहून ही जास्त चाललेल्या स्वातंत्र्यलढ्यास यश आले आणि जगाच्या पटलावर स्वतंत्रपणे हिंदुस्तान उभा राहिला या हिंदुस्थानाला स्वतंत्रपणे उभे करण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. या हिंदुस्थानाला एकसंध करण्यासाठी वेगवेगळे धोरणे अनेक समाज धुरीनांनी आखले त्यात प्रामुख्याने डॉ. बाबासाहेबांचे स्थान अनन्यसाधारण आहे. हिंदुस्तान राष्ट्र म्हणून उभारी घेण्याआधी त्याच्या सार्वभौमिकत्वाला धोका निर्माण होईल याचे पुरेपूर दक्षता ब्रिटन होऊन आलेल्या त्रिमंत्री मंडळ अर्थात कॅबिनेट मिशनने घेतली. तारीख १२ मे १९४६ रोजी या कॅबिनेट मिशनने एक प्रगटन सादर केले, त्यात एक कायदा तयार केला. तो पुढीलप्रमाणे भारताबरोबर भारतातील सर्व संस्थानिकांनाही स्वातंत्र्य देण्यात येईल. आणि हाच भारताच्या भावी उभारणीला घातक होईल असे धोरण ठरले. हिंदुस्थानाच्या भावी वाटचालीस अडथळा आणणारा हा कायदा करून कॅबिनेट मिशनने सामाजिक एकतेवर घाला घातला. यात संस्थानिकांना परस्पर हक्क देऊन त्यांना तीन पर्याय दिले (१) भारतात विलीन होता येईल. (२) भारतात राहायचे नसेल तर पाकिस्तानात विलीन होता येईल. (३) किंवा दोन्ही पैकी कुठल्याही राष्ट्रात विलीन व्हायचे नसेल तर स्वतंत्र राष्ट्र म्हणून त्यांना जगता येईल.!

ब्रिटिशांचे हे राष्ट्रघातकी मनसुबे बाबासाहेबांनी ओळखले व दिनांक १७ डिसेंबर १९४६ रोजी भारताच्या संसदेत ब्रिटिश व सर्व संस्थानिकांना आणि मुस्लिम लीगला उद्देशून म्हणाले की, कोणतीही शक्ती भारताला एकात्म होण्यापासून प्रतिबंधित करू शकत नाही. अशी सिंहगर्जना केली. निजामाचा सरदार कासिम रझवीने निजामाच्या सांगण्यावरून हैदराबाद मध्ये हिंदूंच्या सामूहिक कतले-ए-आम करण्याचा प्रघात करण्याचे ठरविले होते. परंतु बाबासाहेबांचे हैदराबाद संस्थानांमधील सहकारी ज्यांना दख्खनचे आंबेडकर या विशेषणाने स्वतः बाबासाहेब ओळख करून द्यायचे ते बी.एस.व्यंकटराव, बी.श्यामसुंदर व जे.एस.सुब्बया यांनी या कासिम रझवीच्या धोरणाला कडाडून विरोध केल्यामुळे ही निजामाची कूटनीती यशस्वी होऊ शकली नाही. यामागेही बाबासाहेब आंबेडकरांचे अप्रत्यक्षपणे विचार त्यांच्या सहकाऱ्यांच्या मागे होते. कॅबिनेट मिशनने दिलेले संस्थानिकांना अधिकार म्हणजे भारताच्या विघटनाचा प्रारंभ ठरेल. असे प्रथमत: बाबासाहेबांनीच सांगितले १७ जून १९४७ रोजी च्या आपल्या जाहीर निवेदनातून बाबासाहेब म्हणाले, भारतातील कोणतेही संस्थान हे स्वतंत्र राहू शकत नाही. हैदराबाद आणि भारताची भौगोलिक एकता अविभाज्य आहे ते हैदराबाद संस्थानाला नष्ट करू देता कामा नये. निजाम हा भारताचा शत्रू आहे त्याची बाजू घेऊ नका.! २७ नोव्हेंबर १९४७ रोजी याच भूमिकेचा पुनरूच्चार करत बाबासाहेब म्हणाले की निजाम हा भारताचा शत्रू आहे त्याची बाजू एकाही अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांनी घेऊ नये. तसेच निजामाबद्दल कुणालाही सहानुभूती दाखवण्याची गरज नाही. एप्रिल १९४८ मध्ये बाबासाहेबांनी मराठवाड्यातील शेड्युल कास्ट फेडरेशनच्या प्रमुख नेत्यांपैकी एक असलेले डी.एस. मोरे यांना एक पत्र काढण्यास सांगितले. त्यात बाबासाहेबांचा आदेश पुढीलप्रमाणे निजामाने स्थापन केलेल्या रझाकार या संघटनेत अनुसूचित जाती व जमातीच्या व्यक्तीने सामील व्हायचे नाही.! निजामाच्या या संघटने पासून गरीब जनतेला विशेषता राष्ट्राला धोका आहे. हा बाबासाहेबांचा आदेश शिरसावंद्य मानून, अनुसूचित जाती व जमाती मधील एकाही व्यक्तीने निजामाबद्दल सहानुभूती दाखवली नाही तसेच रझाकार संघटनेपासून अलिप्त राहिले. बाबासाहेबांचा हा आदेश मानणाऱ्या अनेक वंचित उपेक्षितांना निजामाने जबरदस्तीने धर्म परिवर्तन करण्यास लावले जर एखाद्या व्यक्तीने याबद्दल काही ब्र शब्द काढले, तर त्याला शंभर कोड्याची शिक्षा मिळत असे. फार पूर्वीपासून बाबासाहेबांना निजामाचे हस्तक म्हटले जाते. परंतु याची वास्तविकता पाहता ज्यावेळी हैदराबादचा मुद्दा संयुक्त राष्ट्र संघाकडे गेला तेव्हा याच निजामाने बाबासाहेबांनी हैदराबाद संस्थानाची वकिली करावी यासाठी विनंती केली होती. केवळ विनंतीच केली नसून मोठी रक्कम ही देऊ केली होती. परंतु बाबासाहेबांनी त्याची विनंती धुडकावून लावली आणि निजामाच्या चाहत्यांना बजावून सांगितले की माझ्या भारताला एकात्म होण्यापासून रोखणाऱ्या धनाढ्य शक्तीला मी कदापि यशस्वी होऊ देणार नाही.! या आधी निजामाने बाबासाहेबांना हैदराबाद राज्यात येण्यास बंदी घातली होती. सन १९४८ च्या ऑगस्ट महिन्यात भारतातील ५२६ पैकी ५२३ संस्थाने भारतात सामांजस करारावर तर काही स्वखुशीने विलीन झाले परंतु हैदराबाद, काश्मीर व जुनागड ही संस्थाने भारतात काही केल्या विलीन होईना अशावेळी सप्टेंबर १९४८ साली भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमण्यात आली. पंडित नेहरूंच्या सूचनेप्रमाणे बाबासाहेबांचे सल्ले या समितीने वेळोवेळी घेतले कारण गांधीजी म्हणाले होते देश उभा करायचा आहे तो बी.आर. शिवाय होऊच शकत नाही. ठरल्याप्रमाणे या समितीने हैदराबाद जुनागड आणि काश्मीरमध्ये लष्करी कारवाई करण्याचे ठरविले. बाबासाहेब आंतरराष्ट्रीय कायद्याचे अभ्यासक होते ते प्रकांड-पंडित होते. बाबासाहेबांनी आंतरराष्ट्रीय कायद्याचा विचार करून सरदार पटेल यांना सांगितले की या कारवाईस लष्करी कारवाई न संबोधता पोलीस कारवाई म्हणावे. जर असे केले नाही तर भारत आंतरराष्ट्रीय न्यायालयात फार अडचणीत येईल. कारण हा वाद आंतरराष्ट्रीय होईल आणि यामध्ये पाकिस्तान ही हस्ताक्षेप करेल. बाबासाहेबांच्या या सल्ल्याने सरदार पटेल यांनी समितीला पुढील कार्य करण्यास सांगितले व पोलीस कारवाई ही संज्ञा वापरून हैदराबाद, जुनागड मध्ये प्रत्यक्षात लष्करच पाठवले. आणि दिनांक १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद सह जुनागड भारतात विलीन झाला मात्र काश्मीरचा प्रश्न अद्यापही सुटलेला नाही. भारतातील संस्थानाच्या विलिनीकरणांमध्ये भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान अनन्यसाधारण आहेच यात दुमत नाही. मात्र भारत सरकार अडचणीत येणार नाही व हैदराबाद मधील जनतेला कुठलीही इजा पोहोचणार नाही याची पुरेपूर दक्षता घेऊन बाबासाहेबांनी दिलेला महत्त्वपूर्ण सल्लाही तेवढाच महत्त्वाचा आहे. हेही लक्षात घेणे गरजेचे आहे. बाबासाहेब आणि हैदराबादचा निजाम बाबासाहेबांचे हैदराबाद लढ्यातील योगदान या सर्व संदर्भावर एक विस्तृत विवेचन करून पुस्तिकेरुपी हा सर्व इतिहास आपल्याला लवकरच वाचाण्यास मिळणार आहे.!

मराठवाड्यातील सर्व जनतेस मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.!!!

लेखक
**आदर्शराजे विकासराव जोगदंड**
(कार्याध्यक्ष :- तथागत प्रतिष्ठान बीड.)

# माजलगाव धरणाचे ११ दरवाजे उघडले; सांडस चिंचोली गाव रेड अलर्टवर



माजलगाव (प्रतिनिधी):- माजलगाव तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाचा जोर कायम आहे. सातत्याने होत असलेल्या या पावसामुळे माजलगाव धरणाची पाणी पातळी झपाट्याने वाढली असून, धरण सुरक्षिततेसाठी प्रशासनाने तब्बल ११ दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे.या निर्णयामुळे सिंदफना नदीत मोठ्या प्रमाणावर पाणी सोडले जात असून, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

सांडस चिंचोली गावाचा संपर्क तुटला धरणातून वाढीव पाणी सोडल्यामुळे सांडस चिंचोली गावाचा बाहेरील संपर्क पूर्णपणे तुटला आहे. गावकऱ्यांना आवश्यक ते सर्व मदतकार्य




पान ४ वरून..

**दुकानांचे पशुधनाचे तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत द्या- शेख निजाम**

मोबदला व आर्थिक मदत करण्यात यावी अशी विनंती महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. ना. अजित दादा पवार साहेब यांच्याकडे केलेली असून शासनातर्फे भरीव मदत बिंदुसरा नदीच्या पुराच्या पाण्यामुळे व झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना मिळणार आहे असे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शेख निजाम,शेख अमर, खय्युम इनामदार,मोमीन जुबेर, सय्यद आजम,शेख हमीद,शेख नसिर,शेख सत्तार इनामदार, शेख खदीर,शेख फारूक,शेख जाकीर यांनी निवेदनात म्हटले आहे

--------------------

**प्राथमिक शाळेकडून प्रशासनाकडे मदतीची मागणी: पावसामुळे शाळेच्या मालमत्तेचे मोठे नुकसान**

,नगरपालिका आणि शिक्षण विभागाला तात्काळ पंचनामा करण्याची आणि दुरुस्तीसाठी आर्थिक मदत देण्याची विनंती केली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचा सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी तात्काळ मदत करावी, असे आवाहन पत्रात करण्यात आले आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी पत्रात म्हटले आहे की, या दुर्दैवी घटनेमुळे शैक्षणिक आणि सामाजिक कार्यासाठी मोठा अडथळा निर्माण झाला आहे. आम्ही सरकारला विनंती करतो की त्यांनी यात लक्ष घालून आवश्यक ती मदत करावी.

या मागणीनुसार, जर सरकारने तातडीने मदत केली तर शाळेचे कामकाज पुन्हा सुरळीत सुरू होऊ शकेल. या पत्राच्या प्रती जिल्हाधिकारी, तहसील कार्यालय,नगरपालिका आणि शिक्षण विभागासह विविध संबंधित अधिकाऱ्यांना पाठवण्यात आल्या आहेत. स्थानिक प्रशासनाने यावर तात्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

--------------------

**अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ रेल्वे मार्गासाठी १५० कोटींची भर**

या आर्थिक वर्षात रेल्वे विभागाला राज्य सरकारचा हिस्सा देण्यासाठी केला जाणार आहे. ‘अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ’ हा रेल्वेमार्ग २६१ किलोमीटर लांबीचा असून, त्याचा एकूण खर्च ४ हजार ८०५ कोटी रुपये इतका आहे. त्यातील ५० टक्के म्हणजे २ हजार ४०२ कोटी रुपये राज्य शासनाचा वाटा आहे. आजपर्यंत शासनाने २ हजार ९१ कोटी २३ लाख रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्यात आता आणखी १५० कोटींची भर घालण्यात आली असून या निधीचे वितरण दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या दोन दिवस आधी वितरीत करण्यात आलेल्या या निधीमुळे या प्रकल्पाच्या विकासाला गती येणार आहे.

बीड जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारल्यापासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विशेष लक्ष केंद्रित केले आहे. विमानतळ, रेल्वे व रस्ते विकासाला चालना देण्यासाठी विभागीय, जिल्हास्तरीय तसेच मंत्रालयीन पातळीवर विविध बैठका घेऊन त्यांनी संबंधित विभागांमध्ये प्रभावी समन्वय साधला आहे. या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम म्हणून ‘अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ’ या महत्त्वाकांक्षी नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग प्रकल्पाला गती मिळाली आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी ‘बीड-अहिल्यानगर’ या टप्प्यावरील रेल्वे धावणार असून त्याचा थेट फायदा बीड जिल्ह्यातील लाखो नागरिकांना होणार आहे.अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ रेल्वेमार्ग म्हणजे बीड, अहिल्यानगर आणि परळी वैजनाथ भागातील शेतकरी, विद्यार्थी, उद्योजक, व्यापारी आणि सामान्य जनतेसाठी विकासाला नवी गती देणारा प्रकल्प आहे. या मार्गामुळे जिल्ह्यातील गुंतवणूक वाढेल, रोजगारनिर्मिती होईल आणि वाहतूक सुलभ होईल. बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी हा प्रकल्प गतीमान करण्याचा माझा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. बीड जिल्ह्याचा चेहरा बदलणाऱ्या या प्रकल्पामुळे बीडकरांच्या आयुष्यात नवा विकासप्रवास सुरू होईल असा विश्वासही उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

--------------------

**केज तालुक्यात पावसाचा हाहाकार**

तीन मंडळात अतिवृष्टी झाली आसून इतर मंडळातही पावसाने हाहाकार उडविला केज तालुक्यातील केज ते विडा या मार्गावरील कानडीमाळी शिवारातील रस्त्यावरील पुलावरून पुराचे पाणी वाहू लागल्यामुळे १० गावचा संपर्क तुटला त्यामुळे सोमवारी सकाळी शाळेला जाणारे कानडीमाळी , साबला , धर्माळा , तरनळी , कोल्हेवाडी , नागझरी , लव्हुरी , येवता, जीवाचीवाडी, व काळुचीवाडी अशा १० गावच्या शिक्षकांसह, नागरिकांची गैरसोय झाली.तर आरणगाव येथिल बोभाटी नदीला आलेल्या पुरामुळे काळेगावघाट, पिंप्री, बोरगाव, कापरेवाडी, वरपगांव, दैठना, नाव्होली, व शिरूरघाट अशा ८ गावचा संपर्क तुटल्यामुळे या भागातील शिक्षक, व नागरिकांची गैरसोय झाली. केजडी नदीला आलेल्या पुरामुळे सोनीजवळा गावचा संपर्क तुटला होता.

--------------------

**माजलगाव धरणाचे ११ दरवाजे उघडले; सांडस चिंचोली गाव रेड अलर्टवर**

महसूल विभागाचे कर्तव्यदक्ष अधिकारी तलाठी मा. चंदेल हे स्वतः पावसात भिजून गावकऱ्यांसोबत उभे राहून त्यांना मार्गदर्शन करत आहेत. सुरक्षा हीच प्राथमिकता आहे. नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करावे. धरण परिसरात किंवा नदीकाठावर अजिबात जाऊ नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

मोबाईल, सेल्फीचा नाद धोकादायक

धरण परिसर व पाण्याच्या प्रवाहाजवळ अनेक तरुण मोबाईलवर व्हिडीओ, फोटो व सेल्फी घेण्यासाठी गर्दी करत असल्याचे दिसून येत आहे. यावर नाराजी व्यक्त करत समाजसेवक नितीन काळे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे फोटोशूटच्या नादात जीवाशी खेळू नका. पाणी कोणत्याही क्षणी अनियंत्रित होऊ शकते. प्रशासनाच्या सूचना पाळा.

पुढील परिस्थिती

हवामान विभागाने पुढील ४८ तासांत अजून पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे विसर्ग वाढण्याची शक्यता कायम असून, नदीकाठच्या गावकऱ्यांनी सतत सतर्क राहणे आवश्यक आहे. प्रशासनाने आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यान्वित केला असून, महसूल व पोलीस यंत्रणा गावागावात गस्त घालत आहे. यात पि.आय.कोळी साहेब, पी. एस. आय.बळवंते साहेब यांनी सतत गावकऱ्यांना संपर्कात ठेवून धीर दिलेला आहे.

# धोकादायक व मोडकळीस आलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांना २१ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर

## मराठवाडा मुक्ती संग्रामदिनी पालकमंत्री अजितदादांचा ताफा अडवण्याचा दिला होता इशारा



बीड (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून अनेक शाळा धोकादायक व मोडकळीस आलेल्या आहेत. जिल्ह्यातील तब्बल ९४ शाळांना इमारतीच नाहीत, तर ३८१ शाळांमधील ६०७ वर्गखोल्यांची तातडीने दुरुस्ती आवश्यक आहे. पावसाळ्यात गेल्या महिनाभरात छप्पर कोसळून विद्यार्थी जखमी होण्याच्या तसेच शाळांच्या भिंती पडण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात टाकून ज्ञानार्जन सुरू आहे.

या गंभीर परिस्थितीवर उपाय म्हणून शिक्षण विभागाने २ वर्षांपासून १४ कोटी ८५ लाख रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला होता मात्र निधी मिळत नव्हता.मात्र गेल्या ९ महिन्यांपासून वारंवार निवेदनं व आंदोलनं करूनही कोणताही ठोस निर्णय झाला नाही. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख - बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य - डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी पालकमंत्री अजित पवार यांच्या गाडीसमोर उडी मारून ताफा अडवण्याचा इशारा मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी (दि.१७) होणाऱ्या रेल्वे कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाला लेखी निवेदनाद्वारे दिला होता.

आंदोलनाच्या केवळ एक दिवस आधीच प्रशासनाने शाळांसाठीचा मोठा निधी मंजूर केल्याचे लेखी पत्र भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद बीड यांनी डॉ. ढवळे यांना दिले. यात शाळांच्या दुरुस्तीसाठी ५ कोटी रुपये आणि नवीन इमारतींच्या बांधकामासाठी १६ कोटी ५० लाख रुपये, असे एकूण २१ कोटी ५० लाख रुपये मंजूर झाल्याचे स्पष्ट करण्यात आले. यामुळे नऊ महिन्यांपासून सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून विद्यार्थ्यांची काही प्रमाणात तरी गैरसोय दूर होणार आहे.

**शाळांच्या दुरुस्तीसाठी ५ कोटी रुपयांचा निधी**

शिक्षणाधिकारी फुलारी यांनी पत्रकाद्वारे कळवले की, जिल्हा नियोजन समिती सर्वसाधारण सन २०२५-२६ अंतर्गत शाळांच्या दुरुस्तीसाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. प्राधान्याने अत्यावश्यक दुरुस्ती असलेल्या शाळांची कामे मंजूर करून दोन ते तीन दिवसांत प्रशासकीय मंजुरी दिली जाणार असून तातडीने कामे सुरू केली जातील. तसेच अतिरिक्त निधीची मागणी शासनाकडे पाठवण्यात येणार आहे.

**१४२ शाळांमध्ये १७२ वर्गखोल्या नव्याने उभारल्या जाणार**

शाळांच्या नवीन बांधकामासाठी १६ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून त्याअंतर्गत खालीलप्रमाणे कामे हाती घेतली जाणार आहेत :

३१ इमारतविरहित शाळांमध्ये ३७ वर्गखोल्या - ३६३.०० लक्ष

८६ शाळांमध्ये धोकादायक वर्गखोल्यांच्या जागी १०७ नवीन खोल्या - १०४९.०० लक्ष

२५ शाळांमध्ये अतिरिक्त २८ वर्गखोल्या - २७७.०० लक्ष

अशा प्रकारे १४२ शाळांमध्ये १७२ वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी १६८९.०० लक्षाच्या कामांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. निविदा प्रक्रिया करून ही कामे तातडीने सुरू केली जाणार आहेत.

# नदीपात्राच्या कडेला अडकलेल्या कुटूंबांला सुखरूप बाहेर काढले

## तुमच्या रूपात देव मदतीला आला;कुटुंब भावनिक!



दौलावडगांव (प्रतिनिधी):- सोमवारी झालेल्या ढगफूटी सदृश परिस्थिती निर्माण झाल्याने मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला.यात नदीसह ओढे व नाले तुडुंब भरून वाहत होतो.एक किलोमीटर अंतरावर पुराचे पाणी सुरू होते.नदीपात्राच्या कडेला दोनही बाजुने पाणी होते.मध्येच दोन कुटुंब अडकले होते.लोकमतचे कडा येथील वार्ताहर हे एका सहकाऱ्याला घेऊन स्वताचा जीव धोक्यात घालून त्या कुटुंबाला सुखरूप बाहेर काढले.

आष्टी तालुक्यातील घाटापिंपरी येथील कडीनदीला सोमवारी पहाटे च्या दरम्यान मोठ्या प्रमाणावर पाणी आले.त्याच बरोबर शेजारील ओडे देखील वाहू लागले होते.एक किलोमीटर अंतरावर दुतर्फा पाणी वाहत असताना पहाटेपासून या काठावर शेतात राहणारे दोन कुटुंब अडकून पडले होते. पत्रकार नितीन कांबळे व सहकारी प्रदिप साबळे यांनी जिवाची पर्वा न करता दोन कुटुंबाला मदतीचा हात देत सुखरूप बाहेर काढले.

# भर पावसाळ्यात कड्याच्या कोल्हापूरी बंधाऱ्याचे दरवाजे बंद ठेवल्याने नुकसान

दौलावडगाव (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील कडा येथील कोल्हापूरी बधाऱ्याचे भर पावसाळ्यात लोखंडी दरवाजे बंद ठेवल्याने पाण्याच्या प्रवाहाने बंधाऱ्यांच्या लोखंडी दरवाज्याच्या चौकटी (फ्रेम) अक्षरशः लाकडा सारखे तुकडे तुकडे होऊन तुटून खाली पडले. हा बंधारा बनवल्या पासून यावर देखरेख करण्यासाठी नेमलेल्या संबंधित कार्यालय - अधिकारी यांचे कायमच दुर्लक्ष राहिले आहे. कारण सगळा मनमानी कारभार सुरू असल्याचे दिसून येते. पावसाळ्यात दरवाजे बंद असतात तर पावसाळा संपल्यानंतर वेळ मिळेल तेव्हा दरवाजे बंद करतात. या बंधाऱ्याचे दरवाजे जरी पावसाळा संपल्यावर लावले तरी जवळपास सर्वच





दरवाज्यातून पाणी गळती होते म्हणून बंधाऱ्यातील पाणी साचून न राहता सगळेच पाणी थोड्याच दिवसात वाहुन जाते. यावर उपाययोजना योजना करण्यात यावे म्हणून संबंधित अधिकाऱ्यांना कित्येकदा लेखी तसेच तोंडी विनंती केली होती. परंतु आजपर्यंत कायमस्वरूपी उपाययोजना काहि केली नाही. यावेळी तर चक्क पावसाळ्यात दरवाजे बंद करून ठेवल्याने या कोल्हापूरी बंधाऱ्याचे तुटफुट होऊन पुर्णतः नुकसान झाले आहे. हे फक्त संबंधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले म्हणून इतके नुकसान झाल्याची चर्चा नागरीक शेतकरी यांच्या होत आहे.आता या बंधाऱ्याची दुरूस्ती कोन व कधी करले या कडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

# १७ सप्टेंबर चे स्वाभिमानी चे शेख खिजर यांचे जल समाधी आंदोलन स्थगित

तलवाडा (प्रतिनिधी):- गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव च प्रश्न चांगलाच गाजत आहे काही बेकायदेशीर अतिक्रमण लोकांनी केले आहे त्या ठिकाणी काहींनी इमारती बांधकाम केले असुन तलाव कोरून गाव तलाव धोखा निर्माण झाला आहे अशी तक्रार स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उप अध्यक्ष शेख खिजर व जयदेव शिगणे यांनी १५ ऑगस्ट रोजी जल समाधी आंदोलन करण्याचा इशारा दिला होता त्या साठी रीतसर निवेदन देण्यात आले होते लेखी आश्वासन त्यांना देण्यात आले मात्र दुसरी नोटीस काढायला ग्रामपंचात कडून उशीर झाल्या मुळे १७ सप्टेंबर चे आंदोलन करण्याचा इशारा दिला होता मात्र दुसरी नोटीस पोस्टाने पाठवली असता त्यामुळे त्याचे आंदोलन स्थगित करण्यात आले



या बाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव शेजारी मातीची संरक्षण भित असुन त्या ठिकाणी काही लोकांनी बेकायदेशीर अतिक्रमण लोकांनी केलेले आहे काही हे अतिक्रमण मातीची भीत कोरून करण्यात आले आहे ही भीत कोरून त्या ठिकाणी पत्र्याचे शेड आडमाफ करण्यात आले आहे एका अतिक्रमण रातोरात करून पत्र्याचे शेड दुकान उभा केले आहे तर काहींनी तर शासकीय नियम डावलुन पक्या इमारती बांधकाम केले आहे कसलाही परवाना नसताना गाव तलाव पाशी ही जागा महसूल हद्द असताना ग्रामपंचात पी टी आर फक्त फक्त कर वसुली साठी असताना अशा लोकांना परवाना कोणी दिला? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडत आहे गाव तलाव भविष्यात धोका निर्माण होईल म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शेख खिजर, जयदेव शिगणे, यांनी स्वातंत्र्य दिनी जल समाधी आंदोलन रीतसर निवेदन संबंधित विभागाशी देऊन करण्यात येणार होते मात्र तत्कालीन गट विकास अधिकारी कांबळे मॅडम यांनी नोटीस देऊन अतिक्रमण काढण्याचे आश्वासन लेखी पत्र देऊन आंदोलन करत्यात नी महिन्या भरा पूर्वी १५ ऑगस्ट चे आंदोलन स्थगित केले होते मात्र दुसरी नोटीस देण्यास ग्रामपंचायत कडून टाळाटाळ होत असताना पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी करण्याचे ठरवले होते मात्र दुसरी नोटीस काढण्यात आली असुन काही अतिक्रमण वाले ही नोटीस घेत नसल्या मुळे नोटीस ही पोस्टने पाठवली असुन लवकरच १ ऑक्टोबर रोजी तिसरी नोटीस काढून तहसील दार यांच्या मार्गदर्शनाखाली बेकायदेशीर अतिक्रमण काढण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन देण्यात आले आहे लेखी पत्र विस्तार अधिकारी उनवणे साहेब, विस्तार अधिकारी राठोड साहेब, प्रशासक चोपडे दादा, ग्रामविकास अधिकारी मुसळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उप अध्यक्ष शेख खिजर, जयदेव शिगणे, दत्ता मोरे,पत्रकार राजाभाऊ विटकर, शेख आतीख, सुमेध करडे उपस्थित होते

# योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीसाठी योगतज्ञ डॉ. राधा सचिन तांबे यांना नवी मुंबई येथे आयुष महासन्मान पुरस्कार प्रदान

बीड (प्रतिनिधी): योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी डॉ. राधा सचिन तांबे यांना आयुष महासन्मान पुरस्कार २०२५ (योगा नॅचरोपॅथी) प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम नवी मुंबई येथील हॉटेल रॅडिसन याठिकाणी दिमाखात पार पडला ,या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नितीन राजे पाटील, अभिनेत्री श्रेया बुगडे (चला हवा येऊ द्या फेम), तसेच मंगला कोहली - सल्लागार, युनायटेड नेशन महिला व बाल विभाग, तसेच आमदार चिखली श्वेता ताई महाले आणि इतर मान्यवर उपस्थित होते.




डॉ. राधा सचिन तांबे यांनी मागील ६ वर्षांपासून योग प्रशिक्षक म्हणून कार्य करत समाजात आरोग्य आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश दिला आहे. त्यांनी तीन आंतरराष्ट्रीय योग स्पर्धांमध्ये सुवर्णपदक मिळवले असून राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरही अनेक पुरस्कार पटकावले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.


त्या राधिका अँडव्हान्स योग सेंटर, बीड या संस्थेच्या संचालिका आहेत. या माध्यमातून त्या ऑनलाईन आणि ऑफलाईन योग वर्ग घेऊन अनेक लोकांपर्यंत योग पोहोचवत आहेत. तसेच विविध योग शिबिरे आयोजित करून लोकांमध्ये योगाचे महत्त्व, आरोग्याची जाणीव आणि मानसिक शांततेचा संदेश पोहोचवत आहेत.

डॉ. तांबे त्या चराठा प्राथमिक आरोग्य केंद्र, बीड येथे योग प्रशिक्षक म्हणूनही कार्यरत असून ग्रामस्तरावर आरोग्य जागरूकता निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना नियमित योगाभ्यासाची प्रेरणा मिळाली असून त्यांनी आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्यास मदत केली आहे. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. समाजासाठी योगाचा प्रसार करणाऱ्या आणि आरोग्यदायी जीवनशैली निर्माण करणाऱ्या डॉ. राधा तांबे यांचे योगदान खरोखरच प्रेरणादायी ठरले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याने तेलगावच्या वैभवात भर

## शिवप्रेमींनी घेतला सेल्फीचा आनंद

परळी (प्रतिनिधी):- बीड परळी महामार्गावर तेलगाव चौकात दि.१४ तालुक्यातील तेलगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रविवारी पहाटे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा दिसून आल्याने शिवप्रेमी मध्ये उत्सवाचे वातावरण पाहावयास मिळाले. उत्साही शिवप्रेमींनी रविवारी दिवसभर महाराजांच्या पुतळ्यासमोर सेल्फी घेण्याचा आनंद लुटला.




दरम्यान या पुतळ्याने तेल गावच्या चौकाला शोभेल असं पहाटे चर्चासुमारास छत्रपती शिवाजी महाराजांची लोकांना दर्शन घडले. तेलगाव चौघाला भर पडली आहे. पडल्याची शिवप्रेमी व नागरिक व्यक्त करत होते.

बीड जिल्ह्यातील चोवरस्त्याचे व दळणवळणाचे मुख्य ठिकाण असलेल्या बीड परळी हवे व धारूर माजलगाव हावे या मेन चौकात तेलगाव येथे शिवाजी महाराज चौक मोठ्या देखाव्या सोबत सोभुन दिसत आहे. येणाऱ्या जाणाऱ्या परवाशाचे आकर्षक दिसणारा हा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा प्रवाशांचे मन जिंकताना दिसत आहे.

# आष्टी-पाटोदा-शिरूर अतिवृष्टी : जनजीवन विस्कळीत शासनाने तात्काळ पंचनामे करा - राहुल जाधव

पाटोदा (प्रतिनिधी)

आष्टी-पाटोदा-शिरुर तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे.



या तीनही तालुक्यातील अनेक भाग पाण्याखाली गेला असून नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. सततच्या पावसामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे पिके पाण्याखाली असल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. गावांमधील रस्ते, ओढे व पुलांवर पाणी आल्याने मोठमोठे खड्डे पडल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे संसार उपयोगी साहित्य देखील वाहुन गेले आहे. प्रशासनाने तात्काळ शेतकऱ्याच्या शेतात जाऊन पंचनामे करावे व तत्काळ शेतकऱ्याला मदत करावी. सततच्या पावसामुळे लोकांच्या घरे पडले आहेत त्यांचेही पंचनामे करून तात्काळ मदत करावी.अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी मा.तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांना प्रसिद्धी पत्रकाद्वारे मागणी केली आहे.




## महाद-ए-मिल्लतच्या वतीने बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न

**बीड : जिल्ह्यातील उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांसाठी इदारा इम्तिहान दिनयात महाद-ए-मिल्लत मालेगाव यांच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १९०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होला. त्यातील यशस्वी १२० विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. सदरील हे बक्षीस सायं.दैः बीड रिपोर्टर चे संपादक शेख तय्यब व भाजपा अल्पसंख्याक मोर्चा जिल्हाध्यक्ष इर्शाद भाई शेख यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. यावेळी काझी जफर, उमेर सलीम, मौलाना मुफ्ती जावेद साहब मौलाना मुफ्ती वसीम कासामी, मौलाना सबदार साहब, हाजी मुदासीर साहब मौलाना तय्यब मिह्वी,फिरदोस खान सर हाफिस खाजा साहब, शाहिद इनामदार या कार्यक्रमाचे आयोजक रियाज सिद्दिकी , मौलाना मुक्तार मिलत सह आदी उपस्थिती होती**

# गेवराईत रस्त्यांचा कर्दनकाळ; माऊलीनगरात चिखलात अडकला विकास, नागरिक संतापले?

## कच्चे रस्ते, साचलेल्या पाण्यामुळे रस्त्यांवरून नागरिकांना चालणं म्हणजे जीव धोक्यात; लोकप्रतिनिधींचे वचने गेले कुठे?

### नगरपरिषद प्रशासन गार झोपेत; रस्त्यांवरून नागरिकांची आरडाओरड, स्मार्ट सिटीच्या गप्पा मात्र फोल?

**गेवराई (प्रतिनिधी) गेवराई शहरातील रस्त्यांची अवस्था अक्षरश: कर्दनकाळ झाली असून, नागरिकांचा रोजचा जीवनप्रवास हा जीवघेणा ठरत आहे. विशेषत: माऊलीनगर भागात रस्त्यांचा प्रश्न अधिकच गंभीर असून, चिखल व साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांच्या हालअपेष्टा सुरूच आहेत. विकासाची गंगा' वाहण्याची आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी आणि नगरपरिषदेचा कारभार मात्र नागरिकांच्या नाकावर टिचून बसलेला आहे. माऊलीनगरात लाखो रुपये कर भरूनही रस्त्यांचा थांगपत्ता नाही, गल्लीबोळ चिखलात गाडलेले, तर नाल्यांमध्ये पाणी तुडुंब भरलेले दिसते. माऊलीनगरात सुसज्ज कुटुंबे राहत असूनही येथे दुजाभाव का, असा सवाल नागरिक करत आहेत. विकासकामांचे लाखो रुपये खर्च होत असतानाही या भागात रस्त्यांची वाट लागलेली आहे, हे प्रशासनाचे व लोकप्रतिनिधींचे अपयशच आहे. रोडवरील गटारी तुडुंब भरल्यामुळे परिसरात दुर्गंधी व अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. याकडे नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाचे व प्रशासनाचे सपशेल दुर्लक्ष झाले आहे.**



याबाबत सविस्तर वृत्त असे की, माऊली नगर भागातील रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. गेवराई नगर परिषदेकडून पावसाळ्यात रस्त्यांची कामे केली जात असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. माऊली नगर भागात कच्च्या रस्त्यावर चिखलमय वातावरण निर्माण झाले आहे. ज्या ठिकाणी रस्ता गरजेचा आहे त्या ठिकाणी रस्ता केला नसल्यामुळे नागरिकात संताप व्यक्त होत आहे एकीकडे विकासाची गंगा वाहू असे पुढार्यांकडून बोलले जात आहे मात्र दुसरीकडे कच्च्या रस्त्यावरून ये-जा करण्यासाठी नागरिकांना मोठा सामना करावा लागत आहे विशेष म्हणजे माऊली नगर भागात सुसज्ज असे नागरिक राहतात पण रस्त्यांची दैना फिटेना लाखो रुपये खर्च करून विकास कामे केले जातात मग माऊली नगर भागात दुजाभाव कसा ? माऊली नगर या भागात सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे अनेक अडचणीला सामोरे जावे लागत आहे त्यामुळे सामान्य माणसाला आज फिरणे देखील मुश्किल झाले आहे. कुठलीही गल्ली बोळ व एकही कॉलनी अशी नाही की ज्यात चिखल झालेला दिसत नाही, यामुळे डास, मच्छर चिलट्यांचा प्रादुर्भाव तर होतच आहे. शहरात नागरिक आजारी पडण्याचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष्य द्यावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे. या खराब रस्त्यांचा सर्वाधिक त्रास शाळकरी विद्यार्थ्यांना सहन करावा लागत आहे. या कच्च्या रस्त्यामुळे जीव मुठीत धरून त्यांना शाळेत जावे लागते. तसेच, शहरातील रस्त्यांची दिवसेंदिवस दुरवस्था झाली असून, अनेक ठिकाणी असलेल्या कच्च्या रस्त्यामुळे नागरिकांसह वाहनचालक त्रस्त झाले आहे.शहरातील ताकडगाव रोडवरील गटारी तुडूंब भरल्या आहेत म्हणून स्थानिक रहिवाशी मेटाकुटीस आले आहेत.पालिका स्वच्छता विभागाने याकडे त्वरित लक्ष घालून समस्या सोडवण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. शहरातील अनेक भागात चिखल झालेला असून त्यांचा त्रास शहरवासीयांना होत आहे.माऊली नगर येथील स्थानिक नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पावसामुळे रस्त्यावर चिखल आणि साचलेले पाणी यामुळे वाहन चालवणे अवघड झाले असून, दुचाकी आणि चारचाकी वाहने घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. याकडे प्रशासन आणि संबंधित नगरपरिषद प्रशासन यांचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

## फलोत्पादन (जिरायत खाते ) विभागाची जागा व्यापारी संकुलासाठी केज नग पंचायत कडे हस्तांतरीत

### ३५,वर्षा चा प्रश्न मार्गी केज वासियांची स्वप्न पुर्ती झाल्या बद्दल नागरिकांतून समाधान व्यक्त-हारुणभाई इनामदार,सिताताई बनसोड.



केज (प्रतिनिधी):- केज शहरातील ३५ वर्षापासून रखडलेला व्यापारी संकुलाचा प्रश्न केज नगरपंचायत चे गटनेते मा. हारुण इनामदार व नगराध्यक्षा मा. सिताताई बनसोड यांच्या अथक परिश्रमातून मार्गी लागल्यामुळे केजवासियां मधून आभार व्यक्त होत आहेत.

केज नगरपंचायत मध्ये गटनेते, हारुन इनामदार व केज नगरपंचायत च्या विद्यमान अध्यक्षा मा. सौ. सिताताई बनसोड यांच्या नेत्रत्वा खाली केज शहरा चा विकास अगदी झपाट्याने होत असल्याचे दिसून येत असून केज शहरातील अत्यंत्य जुना व सर्वांच्या जिव्हाळ्या चा प्रश्न म्हणजे फलोत्पादन खात्यातील जागा व्यापारी संकुलासाठी मिळावी यासाठी मा. हारून इनामदार व नगराध्यक्षा मा. सौ. सिताताई बनसोड यांनी अथक परिश्रम करून मार्गी लावला असून राज्याचे उपमुख्यमंत्री यांनी फलोत्पादन ( जिराईत खात्याची ) जागा व्यापारी संकुलास दिली असून तसे आदेश दिले आहेत त्यामुळे ३५ वर्षापासून प्रलंबीत असलेला व्यापारी, व्यावसाय धारक यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे केज शहरातील नागरीकातून मा. हारूनभाई इनामदार व नगराध्यक्षा मा. सौ. सिता ताई बनसोड यांचे आभार मानले आहेत, मा. हारून इनामदार व नगराध्यक्षा सौ. सिताताई बनसोड यांच्या नेतृत्वा खाली केज शहराचा विकास होत असून शहराचा चेहरा मोहरा बदलत असून व्यापारी संकुलाचा प्रश्न मार्गी लावल्यामुळे केज वासियांतून केज नगर पंचायत चे आभार व्यक्त होत आहेत. तसेच नागरिकातून समाधान व्यक्त होत आहे.


## केज शहरात होणाऱ्या व्यापारी संकुलाला लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे : रोहीत कसबे

केज (प्रतिनिधी):- केज शहरातील फलोत्पादनाची असणारी जमीन आज केज नगरपंचायतच्या ताब्यात गेली आहे. तसेच केज नगरपंचायतच्या नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हारुण भाई इनामदार साहेब यांनी पत्रकार परिषद घेऊन ती जमीन निर्विवादपणे केज नगरपंचायतच्या ताब्यात आल्याचे स्पष्ट केले आहे. त्या ठिकाणी भव्य व्यापारी संकुल उभा करून व्यापाऱ्यांच्या प्रश्नांना मार्ग काढत हे व्यापारी संकुल सर्वांसाठी उभा होत आहे असे प्रतिपादन केले आहे तरी ही आनंदाची बातमी ऐकताच केज शहरातील दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समिती व सकल मातंग समाजाच्या वतीने या व्यापारी संकुलाला लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांचे नाव देऊन मातंग समाजाची मागणी आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व्यापारी संकुल अशी मागणी जोर धरत असून अण्णाभाऊ साठे यांचे नाव या वापरला संकुलाला देण्यात यावे अशी मागणी दलिता अन्याय अत्याचार निर्मूलन समिती व त्यांचे सर्व पदाधिकारी यांची आहे. यासंदर्भाने लवकरच दलितांनी अत्याचार निर्मूलन समिती व त्यांची कोअर कमिटी नगरपंचायतच्या नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते हारूणभाई इनामदार साहेब यांची भेट घेऊन त्यापद्धतीची मागणी करणार असे वृत्तांत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष रोहित कसबे यांनी केले.



## प्राथमिक शाळेकडून प्रशासनाकडे मदतीची मागणी: पावसामुळे शाळेच्या मालमत्तेचे मोठे नुकसान

बीड (प्रतिनिधी):- महाराष्ट्र - गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. याच पावसाचा फटका बीडमधील बार्शी नाका परिसरातील महात्मा फुले प्राथमिक विद्यालय अशोक नगर बीड या शाळेला बसला असून, शाळेच्या मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. यासंदर्भात शाळेच्या प्रशासनाने जिल्हाधिकारी, तहसील कार्यालय,नगरपालिका आणि शिक्षण विभागाकडे तातडीने मदतीची मागणी केली आहे.



१५ सप्टेंबर २०२५ रोजी शाळेने सादर केलेल्या पत्रात त्यांनी पावसाच्या नुकसानीचा तपशील दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शाळेच्या आवारात व परिसरातील जमिनींमध्ये पाणी शिरले आहे, असे पत्रात नमूद आहे. यामुळे शाळेच्या मालमत्तेचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः, शाळेच्या कार्यालयात, विद्यार्थ्यांच्या वर्गांमध्ये व शालेय पोषण आहाराच्या ठिकाणी पाणी शिरल्याने पोषण आहाराचे आणि अभिलेखांचे नुकसान झाले आहे.

पावसाच्या पाण्याने मैदान आणि वर्गाच्या खोल्यांमध्येही चिखल झाला आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोठा व्यत्यय येत आहे, असे शाळेच्या प्रशासनाने सांगितले. याशिवाय, पिण्याच्या पाण्याची टाकी, पाण्याची पाईपलाईन आणि सांडपाण्याची व्यवस्थादेखील बाधित झाली आहे. शाळेच्या आवारात पाणी साचल्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन, शाळेने जिल्हाधिकारी, तहसील कार्यालय पान २ वर...

## बिंदुसरा नदीच्या पुरामुळे व अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या पडझड झालेल्या घरांचे दुकानांचे पशुधनाचे तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत द्या- शेख निजाम

बीड (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यात मागील पावसाळ्याच्या हंगामामध्ये अत्यंत संततधार पाऊस सुरू असल्यामुळे बीड जिल्ह्यातील अनेक लहान मोठे प्रकल्प तुडुंब भरलेले आहेत व नद्या नाले ओसंडून वाहत आहे एक-दोन दिवसापासून बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे त्यांचे उभे पिक हातातून गेलेले आहे बीड शहराच्या मध्यवर्ती भागातून बिंदुसरा नदी वाहते मागील एक दोन दिवसापासून पडणाऱ्या संततधार पावसामुळे बिंदूसरा नदीला पूर आलेला असून त्यामुळे व अतिवृष्टीमुळे विशेषता बीड शहराच्या मोमीनपुरा परिसर, खासबाग परिसर , बालेपिर बांगरणाला परिसर, लेंडी नाला परिसर, सेंटर नाला इत्यादी भागात मोठ्या प्रमाणात घरांमध्ये दुकानांमध्ये पाणी शिरलेले आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांचे व्यवसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे यामध्ये अनेक पशुधन मृत्युमुखी पडल्याचे दिसत आहे या भागातील अनेक घरांची पडझड झालेली असून शासनाने याचे त्वरित पंचनामे करून संबंधितांना पान २ वर...








हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT